नगरपरिषदामध्ये नागरिकांच्या मागासवर्ग
प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांचे आरक्षण
चक्रानुक्रमे फिरविण्यासंबंधी....

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नपा-२०१४/प्र.क्र.१/का.६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दि. ०८/०१/२०१५

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर नगर परिषदा / नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्रातील महानगरपालिका नगर परिषदा आणि नगर पंचायती या नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्याबाबत क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५, दि. ३ मे, २००५ व क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.५/का.५, दि. १० जुलै, २००९ च्या आदेशान्वये आरक्षण फिरविण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची सोडत कशाप्रकारे काढण्यात यावी याबाबत स्पष्ट उल्लेख नाही.

ज्याअर्थी सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १८ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे नगरपरिषदेच्या प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम

१०अ(४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन यासंदर्भात दि. ३ मे, २००५ व दि. १० जुलै, २००९ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढताना अनुसरावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करुन देण्यात येत आहे :-

१) प्रथम सर्व प्रभागांमध्ये या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले प्रभाग वगळण्यात यावेत.

२) त्यानंतर उर्वरित प्रभागांमधून मागील निवडणुकांमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळण्यात यावेत.

३) यानंतर शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांव्यतिरिक्त (म्हणजेच नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित करावयाच्या एकूण संख्येमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांकरिता आरक्षित करावयाची संख्या वजा केल्यानंतर येणाऱ्या संख्येइतके) प्रभाग सोडतीने निश्चित करण्यात यावेत.

४) यानंतर उर्वरित प्रभागाच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांची सोडत काढण्यात यावी.

मात्र जर उर्वरित प्रभागांच्या चिठ्ठयांमधून मागील निवडणुकांमध्ये कोणत्याही प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित असलेले प्रभाग वगळून शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता आरक्षित पदांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास शिल्लक राहिलेले सर्व प्रभाग नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित होतील व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता

आरक्षित करावयाचे उर्वरित प्रभाग वगळण्यात आलेल्या प्रभागामधून सोडतीने निश्चित करण्यात येतील. अशा अपरिहार्य परिस्थितीमध्ये काही प्रभागांमध्ये महिला आरक्षण पुन्हा येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( मधुकर भि. गायकवाड )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मुख्याधिकारी, नगर परिषदा (सर्व)
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
४. निवड नस्ती (कार्या.६)